10-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 5/9/2025 11:34 PM Page 1



वनविभागाच्या मदतीने खैराच्या झाडांची बेकायदेशीर कत्तल?

» पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



भारत-पाक तणावामुळे आयपीएल लांबणीवर

» पान ४ वर

वेर्णा, शनिवार, १० मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 247 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 10 May 2025 | Pages 4 | ₹ 4

# सीमेवरील तणाव शिगेला; पाकिस्तानकडून ड्रोन हल्ले सुरूच !

## भारताकडून चोख प्रत्युत्तर : गोळीबारही सुरू, काही भागांत ब्लॅकआउट

■ नवी दिल्ली, दि. ९:

**भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने शुक्रवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत कर्नल सोफिया कुरेशी यांनी गुरुवारी रात्री देशाच्या विविध भागांवर झालेल्या संभाव्य हवाई हल्ल्यांची माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, पाकिस्तानी सैन्याने भारताच्या लष्करी पायाभूत सुविधांना लक्ष्य करत मोठ्या प्रमाणावर ड्रोनच्या मदतीने घुसखोरीचा प्रयत्न केला.**

कर्नल कुरेशी म्हणाल्या, गुरुवारी रात्री लेहपासून सर क्रीकपर्यंतच्या ३६ ठिकाणी सुमारे ३०० ते ४०० ड्रोन पाठवण्यात आले. यापैकी अनेक ड्रोन भारतीय सुरक्षा दलांनी कायनेटिक आणि नॉन-कायनेटिक तंत्रज्ञानाने पाडले.

त्यांनी स्पष्ट केले की, एवढ्या मोठ्या प्रमाणावर ड्रोनच्या घुसखोरीमागे भारताची हवाई संरक्षण प्रणाली तपासणे आणि संवेदनशील माहिती मिळवण्याचा हेतू असावा. ड्रोनच्या अवशेषांची फॉरेन्सिक तपासणी सुरू आहे. प्राथमिक तपासणीत हे ड्रोन तुर्की-निर्मित असल्याचे आढळून आले आहे, असेही त्या म्हणाल्या.

दरम्यान, पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी या हल्ल्याच्या आरोपांचा इन्कार केला आहे. भारताच्या लष्करी सूत्रांनी वृत्तसंस्था पीटीआयला सांगितले की, जम्मू, सांबा आणि पठाणकोट परिसरात ड्रोनचे हालचाली स्पष्टपणे दिसून आल्या. फिरोजपूर जिल्ह्यातील एका वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्याने तीन स्फोटांचे आवाज ऐकले असल्याची पुष्टी केली आहे.



सीमेवर वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर जम्मू-काश्मीरमध्ये पुन्हा गोळीबार सुरू झाल्याचे वृत्त आहे. उपलब्ध माहितीनुसार, कुपवाडा, उरी, पूंछ आणि तंगधार भागांत संध्याकाळी ७:२० वाजता गोळीबार झाला. वृत्तसंस्था एएनआयने दिलेल्या माहितीनुसार, उरी सेक्टरमध्ये गोळीबारासह स्फोटांचे आवाज ऐकू आले. याशिवाय, पठाणकोटमध्येही स्फोटांचे आवाज नोंदवले गेले आहेत.

भारतीय लष्कराने सांगितले की, पाकिस्तानकडून सीमेवर तीव्र गोळीबार करण्यात येत आहे. या कारवायांमध्ये काही भारतीय जवान शहीद झाले असून भारताने प्रत्युत्तरात पाकिस्तानला मोठे नुकसान पोहोचवले आहे. मात्र, मृत आणि जखमी भारतीय जवानांची नेमकी संख्या देण्यात आलेली नाही.

जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी ट्विटर वर लिहिले की, जम्मूमध्ये पूर्ण ब्लॅकआउट असून, संपूर्ण शहरात सायरनचे आवाज ऐकू येत आहेत. काही वेळापूर्वी ( संध्या : ७:३० ) जड तोफखान्यांचे स्फोटही ऐकू येत होते. ते पुढे म्हणाले, लोकांनी रस्त्यावर येऊ नये. आपल्या घरीच सुरक्षित राहावे. अफवांकडे लक्ष देऊ नये व अप्रमाणित माहिती पसरवू नये.सीमेलगतच्या जिल्ह्यांमध्ये गुरुवारी रात्रीपासून वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. तणाव लक्षात घेऊन प्रशासनाने काही जिल्ह्यांमध्ये संध्याकाळपासून ब्लॅकआउट लागू केला आहे.

भारत-पाकिस्तान सीमेवरील तणाव वाढल्यानंतर नियंत्रण रेषेच्या जवळ असलेल्या

पान २ ▶

### फिरोजपूरमध्ये ड्रोन पडल्याने घराला आग

**फिरोजपूरमधील खाई सेमे गावात ड्रोन पडल्यानंतर एका घराला आग लागली. यामध्ये तीन जण गंभीर जखमी झाले. तिघांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, जेव्हा ड्रोन पडला तेव्हा घरातील दिवे चालू होते. त्याच वेळी, गुरुदासपूरमधील करतारपूर कॉरिडॉरपासून २० किमी अंतरावर एक मोठा स्फोट झाला.**

### ७ दहशतवाद्यांचा खात्मा

**सीमा सुरक्षा दलाने (बीएसएफ) गुरूवारी (दि.८) मध्यरात्री दहशतवादी घुसखोरीचा डाव हाणून पाडला आहे. यामध्ये जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेशी संबंधित सात दहशतवाद्यांचा खात्मा केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. रात्री ११ वाजता बीएसएफच्या जवानांना संशयास्पद हालचाली दिसून आल्यावर त्यांनी तत्काळ कारवाई सुरू केली. या ऑपरेशनमध्ये पाकिस्तानच्या धंधार पोस्टचे दहशतवाद्यांकडून मोठे नुकसान करण्यात आले.**

## निवडक

### लालूंच्या अडचणीत पुन्हा वाढ

**नवी दिल्ली, दि. ९ :** नोकरीच्या बदल्यात जमीन घोटाळाप्रकरणी राजदचे प्रमुख आणि माजी पेंद्रीय मंत्री लालूप्रसाद यादव यांच्याविरुद्ध खटला चालवण्यास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ईडीला मंजुरी दिली आहे. सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये बिहारचे माजी मुख्यमंत्री, त्यांचे पुत्र आणि राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव व कुटुंबातील इतर सदस्यांवर मनी लॉण्डरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) आरोपपत्र दाखल केले होते. २००४-२००९ दरम्यान तत्कालीन पेंद्रीय रेल्वेमंत्री असलेल्या लालूप्रसाद यादव यांनी भारतीय रेल्वेमध्ये ग्रुप डी पर्यायी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीत भ्रष्टाचार केल्याचा आरोप आहे. सीबीआयच्या एफआयआरवरून हा खटला सुरू झाला आहे. रेल्वेमध्ये नोकरीच्या बदल्यात उमेदवारांकडून लाच म्हणून जमीन घेण्यात आली होती. या जमिनी थेट किंवा अप्रत्यक्षपणे लालूप्रसाद यादव यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदवण्यात आल्याचा आरोप आहे.

### रॉबर्ट फ्रान्सिस प्रीव्होस्ट बनले नवे पोप

**व्हॅटिकन, दि. ९ :** व्हॅटिकनमध्ये झालेल्या पोप कॉन्क्लेव्हच्या दुसऱ्या दिवशी नवीन पोपची निवड करण्यात आली. ६९ वर्षीय रॉबर्ट फ्रान्सिस प्रीव्होस्ट यांची नवीन पोप म्हणून निवड झाली आहे. पोप बनणारे ते अमेरिकेतील पहिले कार्डिनल आहेत. त्यांनी स्वतःसाठी पोप लिओ-१४ हे नाव निवडले आहे. १३३ कार्डिनल्सच्या दोन तृतीयांश बहुमताने (८९ मते) त्यांची पोप म्हणून निवड झाली. १९०० नंतर दोन दिवसांत नवीन पोपची निवड होण्याची ही पाचवी वेळ आहे. मतदानाच्या दुसऱ्या दिवशी, रोमन कॅथोलिक चर्चच्या सिस्टिन चॅपलच्या चिमणीतून पांढरा धूर निघत होता, जो नवीन पोपची निवड झाल्याचे दर्शवितो. नवीन पोपची निवड होताच व्हॅटिकनमध्ये उपस्थित असलेल्या ४५ हजारांहून अधिक लोकांनी टाळ्या वाजवून एकमेकांचे अभिनंदन केले.

### चंदीगडमध्ये फटाके फोडण्यास बंदी

**चंदीगड, दि. ९ :** पाकिस्तानच्या हल्ल्यानंतर चंदीगड प्रशासन सतर्क झाले आहे. शहरातील दहशतवादी धोक्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी डीसी निशांत कुमार यादव यांनी दोन आदेश जारी केले आहेत. डीसीने जारी केलेल्या पहिल्या आदेशानुसार, ७ जुलै या कालावधीत चंदीगडमध्ये कोणत्याही प्रकारचे फटाके, बॉम्ब किंवा फटाके फोडण्यास पूर्ण बंदी आहे. बारावीपर्यंतच्या कोचिंग संस्था बंद राहतील, असे डीसी निशांत यादव यांनी सांगितले. बाजार परिसर संध्याकाळी ७ नंतर बंद राहील. बाजार बंद करण्याचा हा आदेश फक्त आजसाठी आहे. कोणीही अफवा पसरवू नयेत, असे त्यांनी सांगितले. ही बंदी लग्न, धार्मिक कार्यक्रम आणि कोणत्याही प्रकारच्या उत्सवांना देखील लागू असेल. प्रशासनाचे म्हणणे आहे की फटाक्यांच्या आवाजामुळे सामान्य लोकांमध्ये भीती निर्माण होऊ शकते आणि ड्रोन किंवा बॉम्ब हल्ल्याची भीतीची परिस्थिती निर्माण होऊ शकते, ज्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडू शकते.

### लष्करप्रमुखांना पुढील ३ वर्षांसाठी सर्वाधिकार

**नवी दिल्ली, दि. ९ :** भारत-पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत बैठकांचा जोर असून गृहमंत्री अमित शाह यांनी नुकतीच प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. दुसरीकडे संरक्षण मंत्रालयाने सैन्य दलाला महत्त्वाचे अधिकार दिले असून पुढील ३ वर्षांपर्यंत हे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तिनही सैन्य दलाच्या प्रमुखांसाठी संरक्षण मंत्रालयाकडून गॅझेट अधिसूचना जारी करण्यात आली आहे. टेरिटोरियल आर्मी नियम १९४८ च्या नियम ३३ नुसार भूदल प्रमुखांना अधिकार देण्यात आले आहेत.

# सुधारित दराप्रमाणे वीज बिलाचा बसणार शॉक

**वीज चोरी रोखण्यासाठी ठोस धोरणांचा अभाव | जेईआरसीसमोर मांडल्या ग्राहकांनी समस्या**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ९ :** शुक्रवारी, वीज ग्राहकांनी संयुक्त वीज नियामक आयोग (जेईआरसी) समोर आपल्या समस्या मांडल्या. यावेळी वीज विभागाने प्रस्तावित केलेल्या वीज दरवाढीमुळे केवळ सामान्य नागरिकांवरच नाही, तर उद्योग क्षेत्रावरही मोठा भार पडणार असल्याचा इशारा दिला. ग्राहकांनी थकबाकी वसूल न होण्याबद्दल आणि मालमत्तेच्या चलनीकरणाबाबत प्रश्न उपस्थित केले, तसेच वीज चोरी रोखण्यासाठी ठोस धोरणांचा अभाव असल्याचे सांगितले.

सुनावणी दरम्यान, मुकुंदराज मुद्रास यांनी वीज विभागाच्या कार्यपद्धतीवर टीका करत, वीज विभाग एक व्यावसायिक संस्था म्हणून काम करत नाही, तर ते एक सरकारी विभागच आहे. यामुळे ग्राहकांकडून वसूल केलेल्या रकमेचा उपयोग त्यांच्या हितासाठी होत नाही. तसेच, वीज चोरी रोखण्यासाठी कोणताही ठोस उपाययोजना नाही, असे ते म्हणाले.



गोवा कॅनचे समन्वयक रोनाल्ड मार्टिन्स यांनी वीज चोरीला संबधित डेटा गोळा करण्याच्या संदर्भात वीज विभागाच्या निष्क्रियतेवर टीका केली. दिल्लीतील लोक गोव्यात व्यावसायिक कारणांसाठी अपार्टमेंट्स घेत आहेत, पण त्यांना घरगुती ग्राहक म्हणून बिल पाठवले जात आहेत. वीज विभागाने नगर नियोजन विभागाकडून डेटा गोळा करावा आणि वीज वापर तपासावा,असे त्यांनी सांगितले.

मार्टिन्स यांची अजून एक मागणी म्हणजे, वीज चोरी रोखण्यासाठी समर्पित पथक तयार करावीत, तसेच विभागाने घेतलेल्या प्रकल्पांचे मूल्यांकन आणि ऑडिट करणे आवश्यक आहे. त्यांनी वीज विभागाकडून थकबाकी वसूल करण्यासाठी आवश्यक पावले उचलण्यासाठी एक श्वेतपत्रिका प्रकाशित करण्याची मागणी केली.

गोवा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री चे जेरार्ड डिमेलो म्हणाले, तिन्ही शिफ्टमध्ये काम करणाऱ्या कारखान्यांसाठी प्रस्तावित वीज दरवाढीमुळे त्यांना मोठा ताण येईल. काही व्यावसायिक आउटलेट्स त्यांच्या वीज वापराची भरपाई करू शकत नाहीत. दुसऱ्या एका उपस्थिताने सांगितले, २०१९-२० मध्ये २५० युनिट वीज वापरणाऱ्याला ४८२ रुपये बिल यायचे, पण आता प्रस्तावित वीज दरानुसार ७५० रुपये बिल द्यावे लागतील.याशिवाय, सरकारी विभागांकडून १०० कोटी रुपयांची थकबाकी वसूल करण्याची आवश्यकता देखील समोर आली.

मुख्य विद्युत अभियंता स्टीफन फर्नांडिस यांनी यावेळी ग्राहकांच्या श्रेणींचे पुनर्गठन करण्यात आले असल्याचे सांगितले. त्यांचे म्हणणे होते की प्रस्तावित वीज दरवाढ केवळ तीन वर्षांसाठी आहे, पाच वर्षांसाठी नाही.

राज्य वीज विभागाने २०२५-२६ साठी सर्व ग्राहक श्रेणींमध्ये ५.९५% वीज दरवाढ प्रस्तावित केली आहे. त्यानंतर, २०२६-२७ साठी ५.६४% आणि २०२७-२८ साठी ४.८८% वाढ प्रस्तावित करण्यात आली आहे. याच दरवाढीला जून २०२५ पासून लागू करण्यात येण्याची शक्यता आहे. विभागाने वीज मागणीच्या वाढीला आणि पायाभूत सुविधांच्या किमतीला वाढीचे प्रमुख कारण ठरवले आहे.

# लईराई जत्रा चेंगराचेंगरीप्रकरण; सरकारला अहवाल सादर



■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ९ :** शिरगावातील लईराई जत्रेत झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी महसूल सचिव संदीप जॅकीस यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीने पाच दिवसानंतर सरकारला अहवाल सादर केला आहे. हा अहवाल १०० पानांचा असून सरकार अहवालावर पुढील निर्णय घेणार आहे. मुख्य सचिव डॉ. वी. कांडावेलू यांच्याकडे अहवाल सादर केला गेल्याची माहिती चौकशी समितीचे प्रमुख संदीप जॅकीस यांनी दिली. अहवालाचा अभ्यास सुरू असून योग्य निष्कर्षापर्यंत

**▶ योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचल्यानंतर मुख्यमंत्री यावर भाष्य करणार**

पोहोचल्यानंतर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यावर भाष्य करतील, अशी माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

मागच्या शनिवारी मध्यरात्री शिरगाव जत्रेत झालेल्या चेंगराचेंगरीत ६ जणांचा मृत्यू झाला होता तर ७० हून अधिक लोक जखमी झाले होते. काही जणांवर गोवा मेडिकल कॉलेजमध्ये उपचार सुरू आहेत. या चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर त्याचदिवशी चौकशीसाठी सरकारने महसूल सचिव संदीप जॅकीस यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. समिती सोमवारी अहवाल देईल, असे सुरवातीला मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. तरीही चौकशीस विलंब झाल्याने अहवालासही उशीर झाला.

वर्षा शर्मा (डीआयजी रेंज), प्रवीमल अभिषेक (वाहतूक संचालक) व टिकमसिंग वर्मा (पोलिस अधीक्षक, दक्षिण गोवा) हे समितीचे इतर सदस्य होते. समितीने जिल्हाधिकारी, पोलिस, देवस्थान समिती, जखमी यांचे जबाब नोंदवून चौकशी केली.

# भारत - पाक तणाव; अवघ्या २३ वर्षांच्या अग्निवीराला वीरमरण

मुंबई, दि. ९ :

जम्मू-काश्मीरमधील उरी येथे गुरुवारी रात्री पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या दहशतवादी हल्ल्यात मुंबईतील जवान मुरली श्रीराम नाईक (वय २३ )यांना वीरमरण आले. मुरली नाईक हे अग्निवीर योजनेअंतर्गत सैन्यात भरती झाले होते. त्यांच्या निधनामुळे घाटकोपरमधील कामराज नगर परिसरात शोककळा पसरली आहे.

भारत सरकारच्या माहितीनुसार, पाकिस्तानने गुरुवारी रात्री जम्मू-काश्मीरमधील अवंतीपोरा, श्रीनगर, तसेच पंजाब, राजस्थान, गुजरात आणि जम्मूतील विविध लष्करी ठिकाणांना लक्ष्य करत दहशतवादी हल्ल्यांचा प्रयत्न केला. भारतीय लष्कराने या हल्ल्यांना चोख प्रत्युत्तर दिले असले तरी काही ठिकाणी नुकसान झाले आहे.

या हल्ल्यादरम्यान शुक्रवारी (९ मे) पहाटे साडेतीनच्या सुमारास जवान मुरली नाईक यांचा मृत्यू झाला. त्यांच्या निधनाची माहिती मिळताच घाटकोपर परिसरात शोकाचा वातावरण निर्माण झाले.

मुरली नाईक यांचे मूळ गाव आंध्र प्रदेशातील सत्यसाई जिल्ह्यातील गोरंटला तालुक्यातील कल्की तांडा आहे. त्यांचा




जन्म २३ ऑक्टोबर २००० रोजी मुंबईतील राजावाडी रुग्णालयात झाला होता. त्यांचे वडील श्रीराम नाईक आणि आई ज्योतीबाई नाईक मुंबईत मजुरीचे काम करतात. कुटुंब गेली अनेक वर्षे घाटकोपरमधील कामराज नगर परिसरात वास्तव्यास आहे.

मुरली यांचे मामा लक्ष्मण नाईक म्हणाले की , मुरली आमच्या घरातील हसतमुख आणि आनंदी मुलगा होता. त्याच्या जाण्याने संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाले आहे. त्याच्या आई-वडिलांशिवाय आता कोणीच उरले नाही.

मुरली नाईक यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण आंध्र प्रदेशमध्ये घेतले होते. डिसेंबर २०२२ मध्ये ते अग्निवीर योजनेंतर्गत सैन्यात भरती झाले. नाशिकच्या देवळालीमध्ये प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांची पहिली पोस्टिंग आसाममध्ये झाली होती. त्यानंतर पंजाब आणि शेवटी जम्मू-काश्मीर येथे त्यांची नियुक्ती झाली होती.

घाटकोपरमधील मुत्तू मारी अम्मा मंदिरात बंजारा समाजातील अनेक सदस्यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. मंदिराचे पुजारी आणि समाजाचे प्रमुख पी. रवी नाईक म्हणाले की , मुरली लहानपणापासून हुशार, शांत आणि कुटुंबवत्सल होता. त्याने देशासाठी बलिदान दिलं, ही गोष्ट आमच्यासाठी अभिमानास्पद असली, तरी हृदय पिळवटून टाकणारी आहे. शेजारी सतीश नाईक म्हणाले, मुरली दोन महिन्यांपूर्वीच घरी आला होता. त्याच्या लग्नाची तयारी सुरू होती. असं काही घडेल याची कल्पनाही नव्हती. तिप्पा नाईक, आणखी एक शेजारी, भावूक होत म्हणाले, मुरली आमचं लेकरू होतं. लहानपणापासून त्याला पाहिलं आहे. त्याच्या जाण्याने आमचं मन सुन्न झालं आहे.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी सोशल मीडियावर श्रद्धांजली अर्पण करत मुरली नाईक यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या. त्यांनी म्हटलं, देशासाठी बलिदान देणाऱ्या मुरली नाईक यांच्या कुटुंबासोबत आम्ही आहोत.राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक नेत्यांनी देखील सोशल मीडियाच्या माध्यमातून मुरली यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

सैनिक महामंडळ आणि भारतीय लष्कराकडून मुरली नाईक यांच्या कुटुंबाला निधनाची माहिती अधिकृतरित्या कळवण्यात आली. त्यांच्या पार्थिवावर मूळगावी आंध्र प्रदेशमधील कल्की तांडा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# मुख्यमंत्र्यांनी घेतला सुरक्षा व्यवस्थेचा आढावा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**▶ कार्यक्षमता आणि सज्जता वाढविण्यावर भर**

**▶ सुरक्षा उपाययोजना अधिक तीव्र करण्याच्या सूचना**

**पणजी, दि. ९ :** मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी शुक्रवारी महालक्ष्मी, आल्तिनो येथे राज्यातील सर्व सुरक्षा यंत्रणा आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन विद्यमान सुरक्षाव्यवस्थांचा सविस्तर आढावा घेतला. राज्यातील उदयोन्मुख सुरक्षा आव्हानांच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या या बैठकीत आंतर-एजन्सी समन्वय अधिक दृढ करून एकूण कार्यक्षमता आणि सज्जता वाढविण्यावर भर देण्यात आला.

मुख्यमंत्र्यांनी ट्विटर प्लॅटफॉर्मवरून या बैठकीबाबत माहिती देताना लिहिले की , कार्यात्मक व्यवस्थांचा आढावा घेण्यासाठी आणि सुरक्षेसंबंधी कार्यक्षमता वाढवण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह बैठक घेतली. आंतर-एजन्सी समन्वय मजबूत करण्यावर भर देण्यात आला.

दरम्यान, गोवा पोलिस विभागाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात सांगण्यात आले आहे की, राज्यातील सुरक्षिततेसंदर्भात संभाव्य धोके लक्षात घेता विविध पातळ्यांवर सुरक्षा उपाययोजना अधिक तीव्र करण्यात आल्या आहेत. या अंतर्गत जिल्हा पोलीस अधीक्षक (एसपी), पोलीस महासंचालक (डीजीपी) यांच्यापासून ते मुख्यमंत्र्यांपर्यंत समन्वय बैठका घेण्यात आल्या असून त्यामध्ये लष्कर, नौदल, तटरक्षक दल, सीआयएसएफ, रेल्वे संरक्षण दल तसेच इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (आयओसीएल) या संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

पोलिस विभागाच्या निवेदनानुसार, गोव्यातील संवेदनशील भागांमध्ये आणि महत्त्वाच्या प्रतिष्ठानांभोवती सुरक्षा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. प्रतिबंधात्मक कारवाई अंतर्गत भाडेकरू आणि नोकरांची पडताळणी, संशयित व्यक्तींवर लक्ष ठेवणे, परदेशी नागरिकांची चौकशी आणि कोम्बिंग ऑपरेशन्स नियमितपणे राबवली जात आहेत.

याशिवाय, राज्यातील किनारपट्टी भागात पोलिसांची गस्त वाढवण्यात आली असून, विशेष नाके आणि जलद प्रतिसाद पथके (क्विक रिस्पॉन्स टीम्स) तयार करण्यात आल्याची माहितीही निवेदनात देण्यात आली आहे.

पान २ ▶